REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 8 | MAY - 2024

# प्राथमिक स्तरावरील आरोग्यविषयक विविध उपक्रमांच्या उपयुक्ततेचा अभ्यास

**चव्हाण पल्लवी जयप्रकाश**
**संशोधिका**
बी.ए., डी.एड.
जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा परंडा ता. परंडा जि. धाराशिव.

## १.१ प्रस्तावना



आज आपण बघतो की, सगळीकडे हसत खेळत शिक्षण असावे असे बोलले जाते. आणि हे हसत खेळत शिक्षण सर्वांनाच मान्य आहे. जर आपल्याला हसत खेळत शिक्षण द्यायचे असेल तर आपण ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणार आहोत त्यांचे आरोग्य चांगले असले पाहिजे.

असे म्हटले जाते की आरोग्य हीच खरी संपत्ती आणि मग हीच संपत्ती लहानपणापासून आपल्या विद्यार्थ्यांकडे नसेल तर आपण कितीही गुणवत्तेच्या गप्पा मारल्या तरी त्याचा काहीही परिणाम जाणवणार नाही. आणि म्हणून शालेय स्तरावरुन आज आपण बघतो कि, शासन वेगवेगळया सुविधा पुरवत आहे. आणि या सुविधा आपण आपल्या शाळेमध्ये वेगवेगळे उपक्रम शालेय स्तरावर राबत आहोत. त्याचा लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

शालेय स्तरावर आरोग्य विषयक जे उपक्रम राबवले जात आहेत. त्याचा नक्कीच उपयोग विद्यार्थ्यांच्या जीवनावर होताना आपणास पाहायला मिळत आहे.

आज हे जे उपक्रम राबवले जात आहेत त्याविषयी वेगवेगळे मतप्रवाह आहेत. त्यामुळे त्याच्या उपयुक्ततेचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

विद्यार्थी स्वत: आरोग्याची काळजी घेत नाही त्यांना आरोग्याचे महत्व माहित नसते व आरोग्याची नीट काळजी घेतली नाही किंवा आरोग्य नीट जपले नाही तर होणा-या दुष्परिणामाची कल्पना नसते म्हणून त्यांना आरोग्याचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. त्यासाठी विविध उपक्रमाद्वारे त्यांच्या समस्या सोडवल्यास त्यांच्या संपादणुकीत वाढ होईल व विद्यार्थी आपल्या आरोग्याची व्यवस्थित काळजी घेईल.

आज शालेय स्तरावर जी गुणवत्तेसाठी स्पर्धा दिसून येत आहे. किंवा गुणवत्तेसाठी जे वेगवेगळे उपक्रम शासन स्तरावर राबवले जात आहेत. आणि गुणवत्ता वाढीसाठी शालेय स्तरावरसुध्दा शिक्षकवर्ग आणि शाळा हेही आटोकाट प्रयत्न करत आहेत.

हे गुणवत्तेचे जीवनातील शालेय स्तरावरील महत्व लक्षात घेता गुणवत्ता वाढीसाठी विद्यार्थी प्रथमत: शारीरिक सुदृढ असला पाहिजे. आणि त्यासाठी विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक माहिती दिली गेली पाहिजे.व त्यांना आरोग्य कसे महत्वाचे आहे हे समजावून सांगण्यापेक्षा प्रत्यक्षात आरोग्य कसे चांगले राहिल यासाठी प्रयत्न केले जात आहेत आणि हे जे उपक्रम आहेत ते खरेच विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत किंवा नाही याचा अभ्यास करणे अतिशय महत्वाचे वाटते.

मानवी जीवन अधिक समृद्धतेने जगण्यासाठी मानवाला चांगल्या आरोग्याची गरज असते आणि चांगले आरोग्य असेल तरच मानवाचे अस्तित्व दीर्घकाळ टिकु शकते.

या संशोधनामध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले असावे, आरोग्य म्हणजे काय? आरोग्य बिघडण्याची कारणे कोणती? याबद्दलची आरोग्य विषयक माहिती विद्यार्थ्यांना मिळावी, त्यांच्यामध्ये आरोग्य विषयक चांगल्या सवयी रुजाव्यात व त्यांचे आरोग्य सुधारावे यासाठी ही समस्या निश्चित केली आहे.

***संज्ञा- प्राथमिक स्तर, ग्रामीण भाग, आरोग्य विषयक समस्या, उपक्रम, परिणामकारकता.***

**१.२ संशोधनाची गरज व महत्त्व**

आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी उपक्रमाची निर्मिती करताना येणाऱ्या समस्यावर उपाययोजना करणे या समस्येमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडीत समस्येचा अभ्यास केला जाणार आहे. त्यामुळे खालील घटकांना त्याचा फायदा होणार आहे.

सध्याचे युग हे प्रदुषणाचे आणि विविध रोगांचे युग आहे. अनेक रोगांची उत्पत्ती अस्वच्छतेतून होते. म्हणून स्वच्छता ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे. या सुविचाराचा दैनंदिन जीवनात आदर आणि वापर करणे. ही आजच्या काळात नितांत गरज आहे. याची सुरुवात आपल्या नित्यक्रमात निद्रेतून जागे झाल्यापासून ते निद्रावस्थेत जाण्यापूर्वी होणे आवश्यक आहे. ज्या अवयवाव्दारे आपण पाहतो.श्वास घेतो. खातो त्या अवयवांची निगा व स्वच्छता प्रत्येकाने राखणे गरजेचे आहे.

**१.विद्यार्थी**

विद्यार्थी वैयक्तिक स्वच्छता राखत नाहीत त्यामुळे त्यांचे आरोग्य व्यवस्थित राहत नाही ते बिघडण्याची शक्यता असते म्हणून त्यांना आरोग्याचे महत्व पटवून देणे हे त्यांच्या दृष्टीने उपयुक्त आहे विद्यार्थ्यांना आरोग्याचेमहत्त्व पटवून देताना विविध उपक्रम राबवावे लागतात या उपक्रमाची उपयुक्तता माहिती झाल्यास व त्यामधील अडचणी वर उपाययोजना

**२.शिक्षक**

या संशोधनाचा फायदा तेथील शिक्षकांना देखील होणार आहे. विद्यार्थी जर आपल्या आरोग्याची काळजी घेऊ लागले किंवा त्यांच्या आरोग्यात कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही तर ते दररोज शाळेत येतील व त्यांची १००% उपस्थिती राहिल. तसेच शिक्षक आपले अध्यापनाचे कार्य मोठया उत्साहाने करतील व विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी तत्पर राहतील.

**३.समाज**

प्राथमिक शाळेतील मुले जर आरोग्याच्या दृष्टीने सदृढ असतील तर त्यामुळे एक प्रकारचा निरोगी समाज किंवा एक उत्कृष्ट तरुण पिढी घडण्यास मदत होईल व निरोगी समाज घडेल.

**संशोधनाचे महत्त्व**

१) सदर संशोधनामुळे उच्च प्राथमिक स्तरावरील आरोग्यविषयक उपक्रमाविषयी व त्याचे होणारे फायदे याविषयी वस्तुनिष्ठ माहिती मिळण्यास फायदा होणार आहे.
२) शिक्षकांना व विद्यार्थ्यांना या उपक्रमाविषयी जास्तीजास्त माहिती झाल्यास ते हे उपक्रम मोठया प्रमाणात राबवतील आणि त्याचा फायदा गुणवत्ता व मुलांचे आरोग्य वाढीसाठी नक्कीच होईल. आणि त्यामुळे विद्यार्थी जसे गुणवत्ता पूर्ण होतील. तसेच आरोग्यादायी सुध्दा होतील म्हणजेच विद्यार्थ्यांची सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल.

**विद्यार्थी**

विद्यार्थी वैयक्तिक स्वच्छता राखत नाहीत त्यामुळे त्यांचे आरोग्य व्यवस्थित राहत नाही ते बिघडण्याची शक्यता असते म्हणून त्यांना आरोग्याचे महत्व पटवून देणे हे त्यांच्या दृष्टीने उपयुक्त आहे सदरचे जिल्हा परिषद कन्या प्रशाला परंडा ता. परंडा विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे.

**शिक्षक**

या संशोधनाचा फायदा तेथील शिक्षकांना देखील होणार आहे. विद्यार्थी जर आपल्या आरोग्याची काळजी घेऊ लागले किंवा त्यांच्या आरोग्यात कोणत्याही प्रकारची अडचण आली नाही तर ते दररोज शाळेत येतील व त्यांची १००%

उपस्थिती राहिल. तसेच शिक्षक आपले अध्यापनाचे कार्य मोठया उत्साहाने करतील व विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी तत्पर राहतील.

**समाज**

प्राथमिक शाळेतील मुले जर आरोग्याच्या दृष्टीने सदृढ असतील तर त्यामुळे एक प्रकारचा निरोगी समाज किंवा एक उत्कृष्ट तरुण पिढी घडण्यास मदत होईल व निरोगी समाज घडेल.

## १.३ समस्या विधान

**प्राथमिक स्तरावरील आरोग्यविषयक विविध उपक्रमांच्या उपयुक्ततेचा अभ्यास**

## १.४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

### संशोधनाची व्याप्ती

१) प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र महाराष्ट्रातील धाराशिव जिल्हयाशी संबंधित आहे.
२) सदर संशोधनासाठी परंडा बीट अंतर्गत येणाऱ्या शाळांशी संबंधित असणार आहे.
३) सदर संशोधनासाठी फक्त परंडा केंद्रातील शाळांची निवड केली जाईल.
४) सदर संशोधन परंडा बीट मधील जि. प. कन्या प्रशाला परंडा या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांपुरतेच संबंधित आहे.
५) प्रस्तुत संशोधन सदर संशोधनासाठी ग्रामीण भागातील मराठी माध्यमाच्या इयत्ता १ ली ते ५ वी प्राथमिक शाळेपुरतेच संबंधित आहे

### संशोधनाची मर्यादा

१) प्रस्तूत संशोधन हे परंडा तालुक्यापुरते मर्यादित असणार आहे.
२) प्रस्तूत संशोधन मोहोळ तालुक्यातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचे ४० पालक, ४० विद्यार्थी व २० शिक्षक यांच्यापुरतेच मर्यादित आहे.
३) संबंधित संशोधनातून अडचणींवर कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही. फक्त उपाय सुचविले जातील.

## १.५ संशोधन समस्येची गृहीतके

१) उच्च प्राथमिक शाळेत आरोग्यविषयी राबवत असलेल्या उपक्रमामुळे आरोग्य उत्तम होत आहे.
२) पूर्वीच्या काळापेक्षा आताच्या काळात आरोग्यविषयीचे उपक्रम जास्त प्रमाणात राबवले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास फायदा होतो आहे.

## १.६ संशोधनाची उद्दिष्टे

१) प्राथमिक स्तरावरील विविध आरोग्यविषयक सोयीसुविधांचा शोध घेणे.
२) प्राथमिक स्तरावरील विविध आरोग्यविषयक शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
३) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक उपक्रम राबविणे.
४) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या आरोग्यविषयक उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.

## १.७ परिकल्पना व चले

### संशोधन परिकल्पना

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विविध उपक्रमाच्या उपयुक्ततेचा परिणाम होईल.

### शून्य परिकल्पना

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विविध उपक्रमाच्या उपयुक्ततेचा कोणताही परिणाम होणार नाही.

**स्वाश्रयी चल**


प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी राबविले जाणारे विविध उपक्रम स्वाश्रयी चल आहेत.

**आश्रयी चल**

प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी राबविले जाणारे विविध उपक्रमांचा विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम आश्रयी चल आहेत.

## १.८ संशोधन पध्दती

**संशोधन पध्दतीचे प्रकार**




प्रस्तुत संशोधन पध्दतीपैकी संशोधिकेने सर्वेक्षण व प्रायोगिक या दोन पध्दतीची निवड केली आहे. कारण प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्याचे आरोग्य विषयक उपक्रमाच्या उपयुक्तेचा अभ्यास विद्यार्थ्यासाठी प्रायोगिक पध्दती उपयुक्त आहे व शिक्षकांडून उपक्रम विषयक माहिती घ्यावयाची असल्यामुळे सर्वेक्षण पध्दती योग्य वाटते.

विद्यार्थ्याच्या आरोग्य विषयक माहिती संकलित करण्यासाठी सदर पध्दती योग्य वाटते

## १.९ संशोधनाची साधने

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिका माहिती संकलित करण्यासाठी संशोधिका निर्मित प्रश्नावली व निरीक्षण व पडताळा सूची या साधनांचा वापर केला आहे.

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण (प्रश्नावली) पध्दतीचा वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्तरावरील आरोग्यविषयक विविध उपक्रमाचा अभ्याय विषयासंबंधी प्रश्नावली देऊन प्रतिसाद घेतला आहे. तर विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी उपक्रम राबविले जातात त्यातील उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यावर कोणता परिणाम होतो हे पाहण्यासाठी निरीक्षणसूची व पडताळासूची याचा वापर केला आहे.

सर्व प्राथमिक स्तरावरील शाळेमध्ये शिक्षक हे आरोग्यविषयक उपक्रम राबवित असल्यामुळे शिक्षकांना प्रश्नावलीतील मुद्दे व प्रश्न सहज समजण्यासारखे आहेत. पथदर्शक अभ्यास केल्यामुळे प्रश्नावलीतील त्रुटी दूर करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे प्रश्नावली व निरीक्षण -पडताळासूचीचा केलेला वापर हा योग्य असा आहे.

प्रश्नावली प्रथम शिक्षकांना देऊन त्यांना आपला प्रतिसाद देण्यासाठी पुरेसा वेळ देऊन शिक्षकांच्या सवडीनुसार सदर प्रतिसाद संकलित केला आहे.

## १.१० सांख्यिकी व ती निवडीची कारणमिमांसा

सांख्यिकी व संख्याशास्त्रीय साधने विश्वसनिय असतात. प्रस्तुत संशोधनासाठी कोष्टकीकरण, शेकडेवारी व आलेख यांचा वापर करण्यात आला आहे.

परंडा तालुक्यातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य व स्वच्छता कशा स्वरुपाची आहे. सद्य:स्थिती बाबत माहिती घेण्यासाठी निरीक्षण तंत्र व पडताळासूची यासाठी शेकडेवारी हे साधन वापले आहे. शेकडेवारी या साधनामध्ये जर १०० प्रमाण असेल तर किती टक्के प्रमाण होते याची माहिती होते त्यामुळे शेकडेवारी हे साधन वापरले आहे. कोष्टकीकरणामुळे सामग्रीतील विभिन्न बाबी स्पष्टपणे व चटकन लक्षात येतात म्हणून कोष्टक/सारणीचा वापर केला आहे.

आलेखसद्वारे चित्रित केलेली माहिती चटकण अवधान खेचून घेते त्यामुळे आलेख या साधनांचा वापर केला आहे.

### १.११ नमूना निवड

- **प्राथमिक शाळेची नमुना निवड**

सदर संशोधनासाठी परंडा तालुक्यातील परंडा बीट परंडा केंद्रातील एकूण ९७ प्राथमिक शाळेपैकी २० शाळांची नमुना निवड ही संभाव्येत्तर आधारित सुगम यादुच्छिक पध्दतीतील लॉटरी पध्दतीने शाळेची नमुना निवड केली आहे.

- **शिक्षकांची नमुना निवड**

सदर संशोधनासाठी परंडा तालुक्यातील परंडा बीट परंडा केंद्रातील मधील एकूण ९७ प्राथमिक शाळेपैकी २० शाळेमधील प्रत्येक शाळेतील एक शिक्षकाची नमुना निवड ही संभाव्येत्तर आधारित सुगम यादुच्छिक पध्दतीतील लॉटरी पध्दतीने शिक्षकांची नमुना निवड केली आहे.

- **पालकांची नमुना निवड**

सदर संशोधनासाठी प्राथमिक स्तरावर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची निवड संभाव्येत्तर आधारित सुगम यादुच्छिक पध्दतीतील लॉटरी पध्दतीने शिक्षकांची नमुना निवड केली आहे.

- **विद्यार्थ्यांची नमुना निवड**

सदर संशोधनासाठी प्राथमिक स्तरावर जि. प. प्रा. शाळा, कन्या प्रशाला ता. परंडा शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची निवड सहेतूक पध्दतीने विद्यार्थ्यांची नमुना निवड केली आहे.

### १.१२ निष्कर्ष

**उद्दिष्ट क्र. १ नुसार मिळालेले निष्कर्ष**

- **प्राथमिक स्तरावरील विविध आरोग्यविषयक सोयीसुविधांचा शोध घेणे.**

१) पालक पाल्य आजारी असल्यास त्याच्याकडे लक्ष देतात असे सर्वच पालकांनी सांगितले आहे. परंतु काही वेळेस आर्थिक अडचणीमुळे थोडेसे दुर्लक्ष होते. गावातील सरकारी दवाखान्यात उपचार केले जातात.
२) सरकारी दखाखान्यात उपचाराच्या सुविधा कमी आहेत असे पालकांचे मत आहे.
३) सर्वांत जास्त ६३% पालकांच्या मते घराजवळील परिसर स्वच्छ असतो तर ३८% पालक परिसर स्वच्छ नाही असे सांगतात.
४) सकस व पौष्टिक आहार म्हणून पालेभाज्या व फळे पाल्यास देण्याचा प्रयत्न केल्यास पाल्य काही भाज्या आवडत नाहीत म्हणून खात नाही. पाल्यांना कुरकुरे, वेफर्स, चॉकलेट अशा वस्तु जास्त आवडतात. फळे आवडीने खात नाहीत.
५) सकस आहार घेण्यास सांगणे यास १००% होय असा प्रतिसाद मिळाला आहे.
६) सर्वच शाळेत प्रथमोपचार पेटी आहे.
७) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना आरोग्यदायक सवयीचा तक्ता ५०% शाळेत लावलेला आहे तर ५०% शाळेत लावलेला नाही.
८) प्राथमिक स्तरावरील ९०% शाळेस क्रीडांगण आहे
९) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सामुहिक कवायत सर्वच शाळेत घेतली जाते अ वरील प्रतिसाद हा सर्वच खेळ प्रकार व क्रीडा प्रकार यास अतिशय चांगला असून बहुतांश शाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी खेळ महत्त्वाचा मानला जावून खेळ व क्रीडा प्रकार कौशल्यात विद्यार्थ्यांना संधी दिली जाते.
१०) प्राथमिक स्तरावरील ४०% शाळेस बगीचा आहे. तर ६०% शाळेस बगीचा नाही.

**उद्दिष्ट क्र.२ नुसार मिळालेले निष्कर्ष**

**प्राथमिक स्तरावरील विविध आरोग्यविषयक शासकीय योजनांचा अभ्यास करणे.**

**उद्दिष्ट क्र. ३ नुसार मिळालेले निष्कर्ष**

१) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना जंतनाशक दिन साजरा करण्यात येतो त्यादिवशी विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळया दिल्या जातात.
२) प्राथमिक स्तरावरील शाळेत विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी विविध आजारावरील लसीकरण मोहिम राबविली जाते

३) प्राथमिक स्तरावरील शाळेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन साजना केला जातो.

### प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विषयक उपक्रम राबविणे.

४) प्राथमिक स्तरावरील १००% शाळेत १५ ऑक्टोबर हा दिवस हात धुवा दिवस म्हणून पाळता जातो.
५) प्राथमिक स्तरावरील १००% विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते.
६) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी केली जाते. वर्षातून किमान दोन वेळेस आरोग्य तपासणी होणे आवश्यक आहे
७) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छता व आरोग्य या विषयी सकाळी लवकर उठावे, स्वच्छ दात घासावेत, साबण लावून अंघोळ करावी, शौचालयाचा नियमित वापर करावे, शौचालयावरुन आल्यावर हात साबणाने स्वच्छ धुवावेत, दात दोन वेळेस घासावेत, नखे केस नियमित कापावेत या स्वच्छता संदेश शाळेत लावले
८) विद्यार्थ्यांना आरोग्य चांगले रहावे म्हणून विद्यार्थ्यांच्या अंगी चांगल्या सवयी रुजविण्यासाठी दररोज स्वच्छ कपडे घालण्यास शाळेतून सांगितले जाते
९) केस स्वच्छ व निटनिटके ठेवण्यास सांगणे सर्वात जास्त ७५% होय असा प्रतिसाद मिळाला आहे
१०) मुख व दात स्वच्छता यास ७५% होय असा प्रतिसाद मिळाला आहे
११) हात रुमाल वापरास सांगणे यास होय ८०% प्रतिसाद आहे

### उद्दिष्ट क्र. ४ नुसार मिळालेले निष्कर्ष

- **प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या आरोग्यविषयक उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.**

१) १००%विद्यार्थी कुवतीनुसार स्वच्छ राहू लागले.
२) सर्वांची आर्थिक पातळी सारखी नसते. तरी काही विद्यार्थी जास्त प्रयत्न करुन समायोजन करुन स्वच्छ राहू लागले.
३) कृती, शक्तीमानचा सन्मान यामुळे विद्यार्थी आकर्षित झाले व स्वच्छ राहू लागले
४) अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व लक्षात आल्याने आपली इतर कारणे, समस्या सोडून ती स्वच्छतेकडे जास्त लक्ष देऊ लागले.
**५)** संशोधकाने संशोधन करत असताना स्वत:करुन आर्थिक मदत केली. चर्चासत्रे, मातापालक सभेमध्ये व शालेय व्यवस्थापन समितीमार्फत या समस्या सोडविल्या.

### पालक प्रश्नावलीतून मिळालेले निष्कर्ष

१) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांस कोणताही आजार नाही.
२) पाल्या शाळेतून आल्यानंतर खाजगी शिकवणी व नंतर शाळेचा अभ्यास व इतर घरगुती कामे यामुळे पाल्यांस खेळण्यासाठी वेळ मिळत नाही अशी माहिती ७५% सर्वात जास्त पालकांनी दिली आहे.
३) पाल्यास दररोज दात घासावयास सांगितले जाते परंतु पाल्य टाळाटाळ करतात. तसेच दात घासले म्हणून खोटे बोलण्याचा प्रयत्न करतात, पाल्या दररोज अंघोळ करतात शौचास जाऊन आल्यास हात धुतात परंतु अतिशय गडबडीने हात धुतात.
४) शिक्षकांनी मार्गदर्शन करावे अशी पालकांनी ६३% सर्वात जास्त पालकांनी इच्छा व्यक्त केली आहे.
५) सर्वच पालक आपल्या पाल्यांचे कपडे करुन देतात.
६) सर्व प्रकारचे लसीकरण पाल्यास केले नाही. लसीकरणाची भीती वाटते, पाल्यास काही झाले नाही त्यामुळे का? लसीकरण करावे असा गैरसमज पालकांमध्ये दिसून येतो.
७) पालकांना लसीकरण व त्याचे फायदे याविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे.

### संदर्भसूची


१) कापोले अरविंद, (२००६), कृतीसंशोधन व नवोपक्रम फडके प्रकाशन मंडळ कोल्हापूर ,
२) करंदीकर, मंगरुळकर,(२००६) आरोग्य शिक्षण, फडके प्रकाशन पहिली आवृत्ती
३) कुंभाजेकर ग.वि.,(१९८९), संशोधन पध्दती व संख्याशास्त्र, कोल्हापूर, फडके प्रकाशन.
४) गाडगीळ स्वाती, (२००७), आरोग्य शिक्षण , सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे पहिली आवृत्ती
५) पंडित बन्सी बिहारी, (१९९५), शैक्षणिक कृतिसंशोधन प्रथमावृत्ती, पुणे नुतन प्रकाशन.

६) पारसनीस हेमलता व देशपांडे लीना (१९९४), शैक्षणिक कृतिसंशोधन प्रथमावृत्ती,पुणे. नुतन प्रकाशन.
७) बापट भालचंद्र गोपाल (१९८६), शैक्षणिक संशोधन, नुतन प्रकाशन
८) जीवन शिक्षण, जुलै २०१०, अंक ४, संपादक अ.मु. बेडगे, प्रकाशक - महाराष्ट्र राज्य शै. संशोधन व प्र. परिषद.
९) जीवन शिक्षण, मार्च २००६ अंक १२ संपादक - एम. जी. मराठे, प्रकाशक- महाराष्ट्र राज्य शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ३०,
१०) जीवन शिक्षण, ऑक्टोबर २०११ अंक ७, संपादक - श्रीधर साळुंके, प्रकाशक - महाराष्ट्र राज्य शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद (विदया परिषद) पुणे ३०,पृष्ठ क्रं.
११) शारीरिक आणि मानसिक आरोग्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापीठ, संपादक - आनंद यादव, प्रथम प्रकाशन २००० नाशिक